# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा,ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२९५१६२६४ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१७/०४/२०२६

### जिल्हा : जळगाव

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१७/०४/२०२६ ते २१/०४/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| पाऊस (मिमी) | 0.0 | 0.0 | 4.0 | 7.0 | 3.0 |
| कमाल तापमान (अं.से.) | 44 | 44 | 41 | 39 | 39 |
| किमान तापमान (अं.से.) | 21 | 22 | 24 | 24 | 22 |
| ढग स्थिती (आकाश) | 5 | 4 | 2 | 2 | 1 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 59 | 55 | 65 | 68 | 67 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 31 | 30 | 32 | 34 | 34 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 9 | 11 | 8 | 7 | 10 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 282 | 323 | 310 | 294 | 298 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश/ इशारा** | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १७ व १८ एप्रिल, २०२६ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता असून दिनांक १९, २० व २१ एप्रिल, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात<br>➢ दिनांक १७ व १८ एप्रिल, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी उष्ण लहर येण्याची शक्यता<br>➢ दिनांक १९ एप्रिल, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जना, विजासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता |
| **विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस)** | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १२ ते १८ एप्रिल, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण राहण्याची शक्यता नाही.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | • अवेळी पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या पिकांची, फळे व भाजीपाल्याची काढणी करुन घ्यावी.<br>• काढणी झालेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी. मळणी करणे शक्य नसल्यास, काढलेली पिके पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरीत्या झाकून ठेवावीत.<br>• अवेळी पावसापासून बचावासाठी उघडयावरील धान्य सुरक्षित स्थळी हलवावे.<br>• पावसाची शक्यता असल्याने कीटकनाशकाची व बुरशीनाशकाची फवारणी शक्यतो पावसाची उघडीप बघून करावी.<br>• नवीन लागवड केलेल्या फळबागेमध्ये जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादंनांचा वापर करावा. नवीन लागवड केलेल्या फळबागांतील रोपांचे उन्हापासून संरक्षण करावे.<br>• बागेस आणि उभ्या पिकांना सकाळी किंवा संध्याकाळी पाणीपुरवठा करावा.<br>• हरभरा व ज्वारी पिकाची काढणी पूर्ण झाली असेल तेथे गरज असल्यास नांगरणी किंवा कुळवणी करून घ्यावी.<br>• पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• कीटकनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी.<br>• कोणत्याही पिकावर कोणतेही कीटकनाशक, बुरशीनाशक किंवा तणनाशक फवारताना , त्या पिकाकरिता |

| | | |
|---|---|---|
| | | त्या रासायनिक औषधाचा लेबल क्लेम असल्याची खात्री करूनच वापर करावा.<br>• भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| **गहू** | पक्वता ते काढणी अवस्था | काढणी केलेल्या पिकाची/ धान्याची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. गव्हाची मळणी, यंत्राच्या सहाय्याने करावी किंवा गव्हाची कापणी व मळणी कंबाईन हार्वेस्टर मशीनने करावी. |
| **मका** | काढणी ते साठवणूक अवस्था | अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. पीक काढणी अवस्थेत आलेले असल्यास त्याची काढणी करावी. तसेच उन्हात चांगले वाळवावेत. साठवण कोंदट किवा ओलसर जागेत करू नये. |
| **उन्हाळी भुईमुग** | आऱ्या सुटणे ते शेंगा पोसण्याची अवस्था | भुईमूगाच्या आ-या जमिनीत जाण्यास सुरुवात झाल्यावर आंतरमशागत करु नये. रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी मिथिल डीमेटोंन २५ ईसी १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सह्यायाने झाडांना/ घडांना आधार/ टेकू द्यावा.<br>पनामा रोगाचे प्रभावीपणे व्यवस्थान करण्यासाठी प्रारंभिक उपाय योजना :-<br>कोणताही रोग फक्त बुरशीनाशके वापरून रोग नियंत्रणाच्या उपायांना मर्यादा येतात. म्हणूनच प्रतिबंधात्मक उपयांवर भर देणे अत्यंत महत्वाचे आहे.<br>केळी कंद निवड व प्रक्रिया :-<br>केळी लागवडीसाठी कंद अथवा मुनवे निरोगी आणि जातीवंत बागेतून निवडावे. लागवडीपुर्वी १०० लिटर पाण्यात १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम अधिक १५० ग्रॅम ॲसिफेट व १५ ग्रॅम स्ट्रेप्टोसायक्लीन घेवून या द्रावणात कंद ३० ते ४० मिनीटे बुडवावीत व नंतर लागवड करावी किंया मुनवे / रोपे जैविक बुरशी (ट्रायकोडर्मा हर्नियानम / ट्रायकोडर्मा एस्पेरेलम) अधिक जैविक जीवाणू (स्यूडोमोनास फ्लोरोसेंरा) च्या द्रावणात बडवून लागवड करावी.<br>ऊतिसंवर्धित रोपांची निवड :-<br>अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर ऊतिसंवर्धित रोपे लावून केळीची लागवड केली जाते. मात्र यात रोपांची निवड अंत्यत महत्वाची आहे. एक सारख्या वाढीचे ३० ते ४५ सेंमी उंचीचे, किमान ५ ते ६ पाने असलेली रोग विरहित आणि उत्तम कणखरता असलेली रोपे असावीत.<br>खालील एकात्मिक रोग व्यवस्थापन पद्धतीने हा रोग नियंत्रित केला जाऊ शकतो :-<br>* चांगल्या कृषि पद्धतींचा अवलंब<br>* शेत तणमुक्त ठेवावे.<br>* दुरावासाचे ( क्वारनटाईन) चे नियम काटेकोरपणे पाळावे , नाविन्यता म्हणून किंवा कॅरहेण्डीश व इतर जनुक समुदायातील (जिनोमिक गट) वाण परराज्यातून आणून त्यांची लागवड करू नये. महत्वाचे म्हणजे एक पिक पध्दतीचा अवलंब न करता केळी फळपिकावर केळी पीक घेणे टाळून पिकांची फेरपालट करावी.<br>* प्रादुर्भावग्रस्त शेतातून बाहेर पडण्यापूर्वी तसेच शेतात जाण्यापूर्वी ट्रॅक्टरचे टायर , नांगर आणि इतर उपकरणे निर्जतुक करणे आवश्यक आहे.<br>* 'क्लीन इन अँड गो आऊट' पॉलिसीचे पालन करा (शेतात प्रवेश करताना प्लास्टिक (पॉलिथिनचे) शूज किंवा फूट कव्हर घाला आणि शेतातून बाहेर पडताना ते काढून टाका आणि पुन्हा वापरण्यासाठी ठेवा) , शेतात प्रवेश करताना बांधावर दोन ड्रम, एक पाणी ठेवण्यासाठी आणि दुसरा निर्जंतुकीकरण द्रावण ठेवण्यासाठी (१% पॉली डायमिथाइल अमोनियम क्लोराईड १ लिटर पाण्यात १० ग्रॅम या प्रमाणात) वापरलेली उपकरणे , हात आणि पाय प्रथम पाण्याने आणि नंतर जंतुनाशक द्रावणाने धुवावे.<br>* खतांचे योग्य व्यवस्थापन करावे, खतांच्या शिफारस केलेली मात्रा (नायट्रोजन कमी प्रमाणात आणि पोटॅशियम जास्त प्रमाणात) वापरावी.<br>* सेंद्रिय खते पुरेशा प्रमाणात वापरून मातीचे आरोग्य सुधारावे. यामध्ये गांडूळ खत , कडुनिंबाचा पेंड, चांगले कुजलेले शेणखत वापरावे. |

| | | |
|---|---|---|
| | | * प्रादुर्भावग्रस्त शेतात 'सावधान' चे बोर्ड लावून, झाडाला रंगीत रिबन बांधावी.<br>* प्रादुर्भावग्रस्त शेतातील पाणी इतर शेतात जाणार नाही याची काळजी घ्यावी. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत. सर्व जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे. पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वछ पाणी द्यावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.** | | |

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान :-

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : १७.०४.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**